आर.सी.सी क्र.१५२६ /२०१८
सरकार विरुध्द दिलीप हाके
**निशाणी क्र. ३५/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. अमोल विश्वनाथ हाके,**

वय – २५ वर्षे, व्यवसाय – शिक्षण,

निवासस्थान– शिरसाळा, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**

**श्रीमती एम. एस. राऊत, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –**

१. दिलीप हाके यांना मी ओळखतो. ते माझे सख्खे चुलत काका आहेत. आज ते न्यायालयात हजर आहेत. ते विवेकानंद कॉलेज, औरंगाबाद येथे नौकरी करीत होते. पोलीसांनी सदर प्रकरणात माझा जबाब नोंदविला होता. पोलीसांनी मला माझ्या जाती संदर्भात विचारले होते. मी त्यांना सांगीतले होते की, माझी जात– हटकर आहे. सदरची जात भटक्या विमुक्त जाती (एन.टी.) या शिर्षा खाली येते. मी माझ्या जातीसंदर्भात तहसीलदार सिल्लोड, समाजकल्याण अधिकारी औरंगाबाद यांचेकडुन प्रमाणपत्र घेतले आहे. सदरच्या दोन्ही प्रमाणपत्रावर माझी जात–हटकर नमुद आहे. मी पोलीसांना सदर प्रमाणपत्रांची झेरॉक्स प्रत दिली होती. मला आता दाखविण्यात आलेल्या झेरॉक्स प्रत ही तिच आहे. त्यास **आर्टीकल–'अ'** देण्यात येत आहे. माझे जाती विषयक मुळ कागदपत्रे कॉलेजमध्ये जमा आहेत. त्यामुळे मी ते न्यायालयात आणु शकलो नाही.

२. पोलीसांनी जाती संदर्भात माझ्या वडीलांकडेसुध्दा विचारपुस केली होती. आरोपी हे माझे सख्खे चुलत काका आहेत. त्यांची जातसुध्दा हटकर हीच आहे. आरोपीच्या कागदपत्रांवर जात धनवार नमुद आहे. धनवार ही जात अनुसुचीत जमाती (एस.टी.) या शिर्षा खाली येते. या अनुषंगाने पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी आरोपी पक्षा तर्फे श्री. ठाकरे ए.के, विधीज्ञ यांचे मार्फत–**

३. हे म्हणने खरे आहे की, आरोपीचे शैक्षणीक कागदपत्रे मला पाहण्याचा कधीही योग आला नाही. हे म्हणने खरे आहे की, माझे मुळ जातप्रमाणपत्र मी सोबत आणले नाही. हे म्हणने खरे आहे की, पोलीसांनी मला माझ्या बद्दल व माझ्या जातीबद्दल विचारपुस केली होती. त्यांनी माझ्याकडे आरोपीच्या

जातीबाबत काहीही विचारपुस केली नाही. हे म्हणने खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब नोंदविल्यानंतर तो मला वाचुन दाखविला नाही. हे म्हणने खरे आहे की, मी पोलीसांना तपासाच्या वेळेस आरोपीची जात धनवार असल्याचे सांगीतले नव्हते. हे म्हणने खरे आहे की, मी याबाबत साक्ष पोलीसांच्या सांगण्यावरुन देत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आरोपीच्या जातीबाबत खोटी साक्ष देत आहे. हे म्हणने खरे आहे की, कॉलेजने जर मुळ कागदपत्रे जमा करून घेतले तर त्या बाबतची नोंद कॉलेज एका झेरॉक्स प्रतीवर आपल्याला देते. हे म्हणने खरे आहे की, आमच्या भावकीमध्ये काही लोकांची जात–धनवर सुध्दा आहे. हे म्हणने खरे आहे की, आमच्या समाजात वडीलोपार्जीतरित्या काही लोकांची जात हटकर व काही लोकांची धनवर झालेली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

समक्ष

**–/स्वाक्षरीत/–**
( श्रीमती एम. एस. सहस्त्रबुध्दे )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– २९/०८/२०२३.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.

**–/स्वाक्षरीत/–**
( श्रीमती एम. एस. सहस्त्रबुध्दे )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद